जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 MAY 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या ३४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिल पासून सुरु झालेल्या आहेत. २७ रोजी विविध ४२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ४० परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या असून परीक्षांसाठी ६५०० विद्यार्थी उपस्थित होते. २७ रोजी ३४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले असून आजअखेर ५१८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केलेले आहेत.

2 9 MAY 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीतर्फे कुलगुरू डॉ. कामत यांचे स्वागत

## उच्च शिक्षण, संशोधन, उद्योगाभिमुख शिक्षणासाठी संयुक्त प्रयत्नांची ग्वाही

**जनप्रवास : कोल्हापूर**

केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त प्रदत्त) महाविद्यालयाच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन तसेच संस्थेचे विश्वस्त भरत पाटील आणि सुनील कुलकर्णी यांनी कुलगुरूंचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. डॉ. कामत यांनी सांगितले की, उच्च शिक्षण संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि उद्योजकीय विचार विकसित करणारे केंद्र बनले पाहिजे. विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणे ही आजच्या शिक्षणव्यवस्थेची प्रमुख गरज आहे. केआयटी सारखी दर्जेदार संस्था ज्या प्रकारे नवीन शैक्षणिक



**कुलगुरू डॉ. कामत यांचे स्वागत करताना साजिद हुदली. सोबत मोहन वनरोट्टी, सुनील कुलकर्णी, भरत पाटील, सचिन मेनन.**

धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग, संशोधन संस्था आणि समाज यांच्याशी अधिक सशक्त संबंध निर्माण करत आहेत, ते कौतुकास्पद आहे.

यावेळी साजिद हुदली यांनी विद्यापीठ आणि संलग्न संस्थांमध्ये अधिक समन्वय निर्माण होऊन विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला. केआयटीचे उपाध्यक्ष सचिन मेनन यांनी विद्यापीठ, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त प्रयत्नांतून नवसंशोधनाला चालना मिळू शकते आणि विद्यार्थ्यांसाठी नव्या संधी उपलब्ध होऊ शकतात, असे सांगितले. डॉ. मोहन वनरोट्टी यांनी विचार मांडले. बैठकीत विद्यापीठ आणि केआयटी यांच्या संयुक्त सहकार्याने अधिक प्रभावी उपक्रम राबविण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

तरुण भारत

2 9 MAY 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी

**कुलगुरू डॉ. रजनीश कामत : केआयटी महाविद्यालयाला दिली सदिच्छा भेट : साजिद हुदली यांनी केले स्वागत**

# उच्च शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांना संशोधक, उद्योजक बनवावे

त. भा. प्रतिनिधी

**कोल्हापूर :** उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि उद्योजक बनण्याची ऊर्जा निर्माण करण्यावर भर द्यावा. असे केल्याने त्यांच्यात स्वयंपूर्ण होण्याची उर्मी निर्माण होईल, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी केली.

केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त प्रदत्त) महाविद्यालयाला डॉ. कामत यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान, शिक्षण संस्था व विद्यार्थ्यांच्या भविष्यावर आधारीत आयोजित बैठकीत ते बोलत होते. प्रारंभी डॉ. कामत यांचा केआयटी महाविद्यालयात प्रवेश होताच संस्तेचे अध्यक्ष साजिद हुदली यांनी स्वागत केले. यानंतर हुदली यांच्यासह संस्थेचे उपाध्यक्ष सचिन मेनन, विश्वस्त भरत पाटील आणि सुनील कुलकर्णी यांच्याशी कामत यांनी संवाद साधत केआयटी महाविद्यालयाची माहिती जाणून घेतली.



**कोल्हापूर : केआयटी अभियांत्रिक महाविद्यालयाला कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांचे स्वागत करताना साजिद हुदली. सोबत (डावीकडून) डॉ. मोहन वनरोट्टी, सुनील कुलकर्णी, भरत पाटील व सचिन मेनन.**

यानंतर आयोजित बैठकीत बोलताना कुलगुरू डॉ. कामत म्हणाले की, विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविणे ही आजच्या शिक्षणव्यवस्थेची प्रमुख गरज आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी केआयटीने पुढाकार घ्यावा. तसेच देशात आदर्श निर्माण होईल अशी शिक्षण व्यवस्था बनवत नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यावरही केआयटीने भर द्यावा.

केआयटीचे उपाध्यक्ष सचिन मेनन म्हणाले, संशोधनाला सामाजिक आणि औद्योगिक मूल्य प्राप्त होणे आवश्यक आहे. तसेच प्रयोगशाळेतील कल्पना प्रत्यक्ष लोकांच्या जीवनात परिणाम घडविणाऱ्या तंत्रज्ञानात रूपांतरित होणेही गरजेचे आहे. संशोधनातून पेटंट्स् निर्माण होत असले तरी त्याचे समाजोपयोगी उत्पादनांमध्ये आणि उद्योगांमध्ये रूपांतर झाले पाहिजे, असेही मेनन म्हणाले.

संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी म्हणाले, पारंपरिक शिक्षण पद्धतीत बदल करून विद्यार्थी केंद्रित, प्रकल्पाधारित शिक्षण देण्यावर भर देण्यासाठी आता पाऊले उचलावी लागतील. तसेच एआय, डिजिटल तंत्रज्ञान, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम आणि उद्योग यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जागतिक स्पर्धेत उतरण्याची धमक निर्माण करावी लागेल.

या बैठकीमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्रभावीपणे राबविणे, उद्योग क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करणे यासह विविध विषयांवर डॉ. कामत व केआयटीचे पदाधिकारी यांच्यात चर्चा झाली. तसेच विद्यापीठ आणि केआयटी यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन प्रकल्प, स्टार्टअप्स, नवोपक्रम, तंत्रज्ञान हस्तांतरण यासह विविध उपक्रम राबविण्यावरही एकमत केले.

## डॉ. कामत यांच्या निवडीने अभिमान

**साजिद हुदली म्हणाले की, डॉ. कामत यांना त्यांच्याकडील शैक्षणिक नेतृत्व गुण, दूरदृष्टी आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील असलेला व्यापक अनुभव याचा विचार करुनच शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवडले याचा अभिमान वाटतो. आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठात नवीन संकल्पना, जागतिक दर्जाचे शैक्षणिक उपक्रम सक्षमपणे राबवल्या जातील यात शंकाच नाही. शिवाय त्याच्याच मार्गदर्शनाखाली विद्यापीठ आणि संलग्न संस्थांमध्ये अधिकचा समन्वय निर्माण होण्यास मदत मिळत राहिल, असा विश्वासही हुदली यांनी व्यक्त केला.**

29 MAY 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अँकर ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ : शिवाजी विद्यापीठात मिशन लाईफ अभियान

# ई कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन मानवासाठी घातक

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

ई–कचऱ्याचे व्यवस्थापन ही जागतिक स्तरावरील समस्या बनली आहे. ई–कचऱ्याचे अयोग्य व्यवस्थापन आरोग्य व पर्यावरणासाठी घातक ठरत असून, याचा सर्वाधिक फटका लहान मुलांना बसत असल्याचे प्रतिपादन ग्रीसच्या शैक्षणिक सल्लागार डॉ. रानिया लम्पाऊ यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठाचे सामाजिक समावेशन अभ्यास केंद्र व इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन लाईफ अभियाना" अंतर्गत ऑनलाईन व्याख्यानात त्या बोलत होत्या.



त्यांनी 'ई–कचरा व्यवस्थापन आणि शाश्वत विकास" विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव होत्या.

डॉ. लम्पाऊ म्हणाल्या, असंघटित क्षेत्रात कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय ई–कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्या कामगारांचे आरोग्य धोक्यात आहे. हा कचरा उघड्यावर जाळल्याने यामधील पारा, कॅडमियम इत्यादी विषारी मूलद्रव्यांच्या विषारी धुरामुळे कामगारांना फुफ्फुसाचे गंभीर आजार होत असून, यकृताचे, मूत्राशयाचे नुकसान व कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. पुरेशा सुरक्षेच्या अभावामुळे या कामगारांना आयुष्यभर अपंगत्व आणि इतर शारीरिक दुखापतींना सामोरे जावे लागत आहे.

तसेच अनेक अनधिकृत रिसायकलिंग केंद्रांमध्ये होणारे बालमजुरीचे शोषण लहान मुलांचे संपूर्ण भविष्य अंधारात ढकलत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## असे करा उपाय

**ई–कचऱ्याच्या संकटावर मात करण्यासाठी 'सर्क्युलर इकॉनॉमी' म्हणजेच इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर कमी करणे, पुनर्वापर, दुरुस्ती, नूतनीकरण शास्त्रीय पद्धतीने पुनर्प्रक्रिया करणे या पंचसूत्रीचा अवलंब करण्याचे आवाहन डॉ. लम्पाऊ यांनी केले. इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे आयुष्य वाढवणे आणि केवळ निरुपयोगी साधनांवरच प्रक्रिया करणे ही काळाची गरज बनली असल्याचे सांगितले.**

प्र–कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, शिवाजी विद्यापीठाचे ई–कचरा व्यवस्थापन केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्र या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तसेच ई–कचरा संकलन ही शिवाजी विद्यापीठातील नियमित प्रक्रियेचा भाग असेल आणि या संदर्भात काही लघु अभ्यासक्रमही सुरू करण्यात येतील. इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागाचे प्रमुख डॉ. पवन गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. मुरलीधर भानारकर यांनी प्रास्ताविक केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

2 9 MAY 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अभ्यासातील सातत्य, शिक्षकांचे मार्गदर्शन हेच यशाचे गमक : कुलगुरू डॉ. कामत

## विवेकानंद कॉलेजला भेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचा एक माजी विद्यार्थी असून, माझ्या जडणघडणीत संस्थेचा मोठा वाटा आहे. सातत्यपूर्ण अभ्यास व शिक्षकांचे अभ्यासपूर्ण मार्गदर्शन यामुळे यश मिळाले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची शिदोरी सोबत घेऊन विद्यार्थी ते कुलगुरू पदापर्यंतचा प्रवास झाला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयास त्यांनी नुकतीच भेट दिली. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी कुलगुरु त्यांचे स्वागत केले. ते म्हणाले, शिवाजी विद्यापीठात कुलगुरू म्हणून नियुक्त झालेले डॉ. कामत संस्थेच्या विवेकानंद कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स विषयाचे माजी विद्यार्थी आहेत. डॉ. कामत यांनी संस्थेमध्ये शिक्षक म्हणून सेवा बजावली आहे.



**कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयास भेटीप्रसंगी कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, कौस्तुभ गावडे, डॉ. श्रीराम साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, हितेंद्र साळुंखे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. एस. एम. गवळी, आजीव सेवक डॉ. आर. व्ही. शेजवळ, पतसंस्थेचे चेअरमन हितेंद्र साळुंखे, प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, प्रा. महेश साळुंखे रजिस्ट्रार एस. के. धनवडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 9 MAY 2026

सकाळ



कंदलगाव : 'केआयटी'मध्ये कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांचे साजित हुदली यांनी स्वागत केले. यावेळी डावीकडून डॉ. मोहन वनरोट्टी, सुनील कुलकर्णी, भरत पाटील, सचिन मेनन आदी.

# शिक्षण संस्था उद्योजकीय विचार विकसित करणारी केंद्रे व्हावीत

## कुलगुरू डॉ. कामत : 'केआयटी'त संवाद

कंदलगाव, ता. २८ : उच्च शिक्षण संस्थांनी केवळ पदवी प्रदान करणाऱ्या संस्था म्हणून न राहता विद्यार्थ्यांमध्ये समस्या सोडविण्याची क्षमता, नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि उद्योजकीय विचार विकसित करणारे केंद्र बनले पाहिजे.

केआयटीसारखी दर्जेदार संस्था ज्या प्रकारे नवीन शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी उद्योग, संशोधन संस्था आणि समाज यांच्याशी अधिक सशक्त संबंध निर्माण करत आहेत, ते कौतुकास्पद आहे,' असे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी व्यक्त केले.

केआयटी अभियांत्रिकी (स्वायत्त प्रदत्त) महाविद्यालयातर्फे शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. कामत यांचे संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, उपाध्यक्ष सचिन मेनन, तसेच संस्थेचे विश्वस्त भरत पाटील, सुनील कुलकर्णी यांनी स्वागत करून शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. कामत बोलत होते. अध्यक्ष हुदली म्हणाले, 'डॉ. कामत यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठ नव्या संकल्पना, जागतिक दर्जाच्या शैक्षणिक उपक्रम आणि परिणामकारक संशोधन यांद्वारे अधिक सक्षम होईल.' उपाध्यक्ष सचिन मेनन, संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनीही मनोगत व्यक्त केले.